प्रेसनोट

दिनांक ०४/०२/२०२१

**आरोपी १) बाबासाहेब शिवाजी गायकवाड वय ४० वर्षे, पद शिपाई, वर्ग ४, नेमणुक विभागीय आरोग्य कार्यालय, लातूर रा. चांडेश्वर ता. जि. लातूर २) पल्लवी दशरथ घाडगे वय २९ वर्षे पद ग्रामसेवक सज्जा चांडेश्वर रा. महाराणा प्रताप नगर लातूर यांनी १०,०००रुपये फीस सह ५,०००/— रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार व त्यांच्या मित्राच्या मौजे चांडेश्वर ग्रामपंचायतच्या हद्यीत सर्वे नं. ५६ मधील ग्रामपंचायत अ.क्र.४२०प्लॉट नं. १० व ग्रामपंचायत अ.क्र. ४२१ प्लॉट नं. ११ प्लॉटची नाव ग्रामपंचायत ८ अ ला नोंदणीसाठी दोघांचे मिळून फेरफार फी व घरपट्टी फीचे १०,०००/— रुपये व फी व्यतिरीक्त १०,०००/— रुपये लाचेची मागणी करत असले बाबतची तक्रार दिनांक ०४/०२/२०२१ रोजी प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ०४/०२/२०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी ग्रामसेवक व सरपंच यांचा मुलगा यांनी तक्रारदार यांच्या मौजे चांडेश्वर ग्रामपंचायतच्या हद्यीत सर्वे नं. ५६ मधील ग्रामपंचायत अ. क्र.४२०प्लॉट नं. १० व ग्रामपंचायत अ.क्र. ४२१ प्लॉट नं. ११ प्लॉटची नाव ग्रामपंचायत ८ अ ला नोंदणीसाठी दोघांचे मिळून फेरफार फी व घरपट्टी फीचे १०,०००/— रुपये शासकीय फी व्यतिरीक्त १०,०००/— रुपये लाचेची मागणी करत असून तडजोडी अंती पंचासमक्ष शासकीय फी व्यतिरीक्त ५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ०४/०२/२०२१ रोजी ग्रामपंचायत कार्यालय चांडेश्वर येथे तक्रादार यांना पाठविले असता वरील नमूद आरोपी लोकसेवक यांनी ५,०००/— रुपये लाचेची रक्कम १३.५७ वाजता पंचासमक्ष ग्रामपंचायत कार्यालय चांडेश्वर येथे स्वतः स्विकारली आहे. म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन लातूर ग्रामीण येथे ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, अटरगे, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :— मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :— मोबाईलक्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :— मोबाईलक्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :— मोबाईलक्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :— १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :— ०२४८२—२४२६७४ |
| ७) | Website | :— www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :— www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :— www.facebook.com/MaharashtraACB |

प्र. पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर